महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग

## समग्र शिक्षा

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

**जा.क्र. मप्राशिप/सशि/ग्रंथालय/२०२३-२४/382** **दि. - 2 FEB 2024**

**प्रति,**
**शिक्षणाधिकारी (प्राथ)/ (माध्यमिक),**
**जिल्हा परिषद,**
**सर्व जिल्हे.**

**विषय :- 'महावाचन उत्सव' या उपक्रमाबाबत Google link भरुन पाठविण्याबाबत.**

**संदर्भ :-१. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२३/ प्र.क्र.३६०/ एसडी-४ दि. २२/११/२०२३.**
**२. या कार्यालयाचे मार्गदर्शक सुचना जा.क्र. मप्राशिप/सशि/वाच/काअ/ २०२३-२४ /३२३६ दि. ०४/१२/२०२३.**
**३. या कार्यालयाचे पत्र क्र.मप्राशिप/सशि/ग्रंथालय/२०२३-२४/१७३ दि.१६/०१/२०२३.**

महावाचन उत्सवाच्या कार्यवाहीबाबत संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये महावाचन उत्सव या उपक्रमाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेला आहेत.

राज्यातील सर्व शाळांमध्ये "महावाचन उत्सव" हा उपक्रमांतर्गत विषय / थिम राबविण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील कोणत्याही घटनेतून मिळालेली सर्वात मोठी प्रेरणा किंवा त्यांच्या जीवनातील कोणतेही तीन पैलू व त्यामधून मिळालेली शिकवण यांचा समावेश करण्याबाबतची थिम सर्व जिल्हा व महानगरपालिकांमध्ये राबविण्याबाबत संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये अवगत करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने सदर थिम आपल्या जिल्ह्यात राबविताना आपल्या जिल्ह्यातील एकूण शाळा संख्या, एकूण विद्यार्थी संख्या आणि सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या याचा तपशिल या कार्यालयास उलट टपाली कळविण्यात यावा. तसेच या सोबत - **https://forms.gle/Na7J4UFsYqhmSh9b6** Google link देण्यात येत आहे. यात अचूक माहिती भरुन दि. ०८/०२/२०२४ पर्यंत पाठविण्यात यावी.

**(संजय डोर्लीकर)**
**उप संचालक (प्रकल्प /प्रशासन)**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव रवाना:-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
२. आयुक्त (शिक्षण), महानगरपालिका, सर्व.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, सर्व.
४. प्रशासन अधिकारी (शिक्षण)/ शिक्षणाधिकारी महानगरपालिका सर्व.
५. शिक्षण निरिक्षक, (उत्तर / दक्षिण/पश्चिम), मुंबई.

**जवाहर बाल भवन, पहिला मजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड (प.), मुंबई - ४०० ००४.**
टेलिफोन नं. : ०२२-२३६३ ६३१४, २३६७ ९२६७, २३६७ १८०८, २३६७ १८०९, २३६७ ९२७४
ई-मेल : mpspmah@gmail.com, samagra-shiksha@mahaedu.gov.in
संकेतस्थळ - https://samagrashiksha.maharashtra.gov.in, https://mpsp.maharashtra.gov.in

D:\Kedare\2023-24\MAHARASHTRA VACHAL CALVAL\LETTER.docx